महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, फोर्ट, मुंबई- ४०० ००१**

दूरध्वनी क्रमांक- ०२२-२२६६४६३८/२२६७१३३३ फॅक्स क्रमांक- ०२२-२२६४४६३८

**Website:-** www.dol.maharashtra.gov.in **E-mail:-** director.dol@maharashtra.gov.in

जा.क्र.१५/परिपत्रक/२०२०-२१/१३८ दिनांक :- ३१/०५/२०२०

ई-मेल द्वारे

राज्यात कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत

वाचा:- १) ग्रंथालय संचालनालयाकडून यापूर्वी निर्गमित परिपत्रके
क्र. १५/परिपत्रक/२०१९-२०/२०२२१, दि.१४/०३/२०२०, क्र.१५/२०१९-२०/२४१४७, दि. ३१/०३/२०२०,
क्र. १५/परिपत्रक/२०२०-२१/५६, दि. १३/०४/२०२०, क्र. १५/परिपत्रक/२०२०-२१/५८, दि. १८/०४/२०२०,
क्र. १५/परिपत्रक/२०२०-२१/८७, दि. ०३/०५/२०२०, क्र. १५/परिपत्रक/२०२०-२१/१०६, दि. १७/०५/२०२०
२) महाराष्ट्र शासन महसूल आणि वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मुदत आणि पुनर्वसन कक्ष, मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक ३१/०५/२०२०

## परिपत्रक

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने संचालनालयाचे वर नमूद परिपत्रकांन्वये अन्वये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून राज्यातील सर्व शासकीय ग्रंथालये, सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये, राज्य, विभाग, जिल्हा ग्रंथालय संघ, संशोधन संस्थांनी चालविलेली शासनमान्य ग्रंथालये यांनी ग्रंथालय सेवा, अभ्यासिका, वाचन कक्ष, इत्यादी सेवा दिनांक ३१ मे, २०२० पर्यंत बंद ठेवण्यात याव्यात व अधिवेशन, कार्यशाळा, चर्चासत्र, ग्रंथोत्सव इत्यादी सारख्या कार्यक्रमांचे आयोजन करु नये असे संचालनालयाचे परिपत्रकांन्वयेसूचित करण्यात आले आहे. सार्वजनिक ग्रंथालये ही अनौपचारिक शिक्षणाचे काम करत आहेत. ग्रंथालय सेवा सुरु केल्याने ग्रंथ देव-घेव कक्षात व वृत्तपत्र वाचन कक्षात येणारे वाचकांमुळे ग्रंथालयांत गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोरोना विषाणूचा संसर्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीमध्ये ग्रंथालयात येणारे वाचक, ग्रंथालय सेवक यांना कोरोना विषाणू संसर्ग होण्याची शक्यता विचारात घेऊनच ग्रंथालय सेवा व सांस्कृतिक कार्यक्रम, कार्यशाळा, चर्चासत्रे, अधिवेशन, इ. सार्वजनिक स्वरुपाचे कार्यक्रम घेण्यास दिनांक ३० जून, २०२० पर्यंत प्रतिबंध करण्यात येत आहे.

उपरोक्त वाचा क्र. २ च्या शासन अधिसूचनेतील मुद्दा क्र. ८ च्या उपबंधांमध्ये दिलेल्या बाबी बंद ठेवण्याचे नमूद आहे. राज्यातील कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून राज्यातील लॉक डाऊन कालावधी दिनांक ३० जून, २०२० पर्यंत वाढविण्यात आला आहे. सदर लॉकडाऊन कालावधी वाढवितांना, कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनांची काटेकोर पणे अम्मलबजावणी करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. त्या अनुषंगाने राज्यातील शासकीय व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांनी उपरोक्त परिच्छेद १ मध्ये नमूद सेवा ३० जून, २०२० पर्यंत बंद ठेवाव्यात. तसेच, वर नमूद क्र. २ च्या अधिसूचनेत दिलेल्या निर्देशांचे राज्यातील सर्व शासकीय ग्रंथालये व सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये, राज्य विभाग, जिल्हा ग्रंथालय संघ, संशोधन संस्थांनी चालविलेली ग्रंथालये यांनी पालन करावे.

(सुभाष हि. राठोड)
प्र. ग्रंथालय संचालक

सहपत्र: - उपरोक्त वाचा क्र. २ ची अधिसूचना.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी: -

१) सर्व सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालये

२) ४३ शासकीय ग्रंथालये

३) राज्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये (जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांमार्फत.)

४) शासनमान्य राज्य ग्रंथालय संघ

५) शासनमान्य विभाग ग्रंथालय संघ

६) शासनमान्य जिल्हा ग्रंथालय संघ

(४ ते ६: सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालयांमार्फत.)

७) शासनमान्यताप्राप्त संशोधन संस्थांनी चालविलेली ग्रंथालये. (जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांमार्फत.)

**प्रत माहितीसाठी सादर-**

१) मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२

२) मा. विभागीय आयुक्त, ६ महसूली विभाग (सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालयांमार्फत.)

३) मा. जिल्हाधिकारी, ३६ जिल्हे (जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांमार्फत.)